संक्षिप्त फौजदारी केस क्र.२९/२०२४
सरकार (महा.शासन)
-वि-
चिदानंद म्हेत्रे + ०१

नि. क्र.३६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ याची साक्ष -**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव : कोमल विवेक नागरगोजे,
वय सुमारे : ४० वर्षे, धंदा - नोकरी,म.पो.ह. ब.नं.१३४,
राहणार : ओरोस, रानबांबुळी, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

---------------------------------------

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.जी.आर. माजगावकर यांचे मार्फत -**

**१.** सन २०२० पासुन मार्च २०२६ पर्यंत मी सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाणे अंतर्गत दुरक्षेत्र कसाल येथे कार्यरत होते. दिनांक २१/०१/२०२४ रोजी कुंदे देवस्थान बाबत दोन गटात वाद असल्याने प्रभारी अधिकारी सपोनी. कोल्हटकर यांनी पेट्रोलींग करण्यासाठी तोंडी निर्देश दिले होते. शासकीय वाहनाने चालक ए.एस.आय. गोसावी, म.पो.कॉ. १२५५ पावस्कर व मी स्वत: पेट्रोलींग करीता गेले होते. आम्ही मुंबई-गोवा महामार्गावर कसाल च्या दिशेने पेट्रोलींग करीत जात असताना ओट्रा रेसिडन्सी जवळ काही लोक थांबलेले दिसले व रस्त्याच्या एक मोटारसायकल पडलेली दिसली. व रस्त्याच्या बाजुला एक महिला विव्हळत असताना दिसली. व एक ट्रक रस्त्याच्या पुढील बाजुस कणकवली च्या दिशने तोंड करून उभा असलेला दिसला.

**२.** गाडी रस्त्याच्या कडेला लावुन, मी व माइ-या सोबत असलेली म.पो.कॉ.पावस्कर व चालक असे आम्ही सदर ठिकाणी जावुन पाहिले असता तेथील लोकांनी सांगितले की अपघात झाला आहे. त्या महिलेला उपचाराची गरज असल्याने तेथे जमलेल्या लोकांच्या मदतीने आमच्या सरकारी गाडीत घालुन तिच्या नवरा-या सांगण्यावरून एस.एस.पी.एम.हॉस्पीटल येथे तिला

उपचाराकरिता दाखल केले. त्यानंतर आम्ही कुंदे येथे जाण्यासाठी निघुन गेलो. अपघातग्रस्त वाहने पोलीस स्टेशन येथे आणल्यानंतर पाहिली होती. मोटारसायकलचा नोंदणी क्र.एमएच-०७-वाय१६०० ट्रकचा नोंदणी क्र.एम.एच.०९ सी.व्ही. ३३३५ असा होता. ट्रकचालकास मी पाहिले होते. त्याचे नाव चिदानंद म्हेत्रे असे असल्याचे समजले. त्याला दाखविल्यास मी ओळखु शकते. आरोपीची गैरहजेरी नि.क्र.३४ कडील अर्जान्वये माफ करण्यात आली आहे. सदरचा अपघात मोटारसायकलस्वार कणकवलीच्या दिशेने जात असतांना विरूध्द दिशने येणा-या मोटारसायकलला साईड देते वेळी त्यांच्या पाठीमागुन येणा-या ट्रकने ठोकरल्याने अपघात झाल्याचे समजले होते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत-</u>**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलींगला जाण्यापुर्वी त्याची नोंद स्टेशन डायरीला केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनात लॉग बुक रजिष्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाच्या लॉग बुक रजिष्टरमध्ये ते वाहन कोठुन कोठे गेले हे नमुद केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनाचा लॉग बुक उतारा मी स्वत:हुन तपासिक अंमलदाराला दिला नाही किंवा त्यानेही माइ-याकडुन मागीतले नाही.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाणे येथे ड्युटी बटवडा रजिष्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, तपासिक अंमलदाराने ड्युटी बटवडा रजीष्टर हस्तगत केले नाही व मी सुध्दा त्यांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्यानंतर आम्ही त्या ठिकाणी पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघात कोणाच्या निष्काळजीपणामुळे घडला होता हे मी सांगु

शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताबाबतची मला समजलेली माहिती ही ऐकीव माहिती आहे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या ठिकाणी ओट्रा रेसिडन्सी पार्क आहे व त्या ठिकाणी बरेच निवासी फ्लॅटधारक निवास करतात. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या ठिकाणच्या अलीकडे पॉपलीन बार आहे. हे म्हणणे खरे आहे की, महामार्गावर दिवस रात्र वाहनांची वर्दळ असते.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर एखादा मोठा आवाज झाला तर ओट्रा रेसिडेन्सी आणि पॉपलीन बार पर्यंत त्याचा आवाज जावु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघातासंदर्भातील मी दिलेली माहिती ही माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा कथीत गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइ-या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी चुकीचा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून फिर्यादीस मदत व्हावी म्हणुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास – नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2026.06.18 17:16:15 +0530

ठिकाण :- ओरोस
दिनांक :- १८/०६/२०२६.

**( श्रीमती एस.ए.कानशिडे )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग-ओरोस.